# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी. : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.


जाक्र.मजीप्रा/सस/1097/सभा–78/आ–4/ /

दिनांक : 1 एप्रिल 1998.

विषय : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 78 व्या सभेचे इतिवृत्त.

गुरुवार दिनांक 19 मार्च 1998 रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 78 व्या सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर करण्यांत येत आहे.

सोबत : 78 व्या सभेचे इतिवृत्त.

जे.एस. साहनी

(जे.एस.साहनी)
सदस्य सचिव (प्रशासन)

अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष.

प्रत कक्ष अधिकारी (आ-४)
यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

M. J. P.
ISSUED
2 APR 1998
MUMBAI-21.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 78 व्या सभेचे इतिवृत्त.

प्राधिकरणाची 78 वी सभा गुरुवार दिनांक 19 मार्च 1998 रोजी सकाळी 10 वाजता मा.मंत्री, ग्राम विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष मा.ना.श्री.अण्णासाहेब डांगे यांचे अध्यक्षतेखाली व मा.राज्यमंत्री, नगर विकास, वित्त व नियोजन, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष मा.श्री.रवींद्र माने हयांचे उपस्थितीत, मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता हयांचे दालनांत संपन्न झाली.

याशिवाय प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

1. श्री.व्ही.रंगनाथन, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई.
2. श्री.नंद लाल, सचिव (2), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
3. श्री.करंदीकर, सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
4. श्रीमती चित्कला झुत्शी, सचिव, वित्त, मंत्रालय, मुंबई.
5. श्री.देवेंद्र फडणवीस, महापौर, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
6. श्री.सुरेश पटवर्धन, पुणे.
7. श्री.माधव कुलकर्णी, पुणे.
8. श्री.आदिनाथ नवले पाटील, बीड.
9. श्री.भानुदास पडळकर, सांगली.
10. श्री.आशिष कुलकर्णी, मुंबई.
11. श्री.राजीव सरदेशपांडे, नागपूर.
12. श्री.जे.एस.साहनी, सदस्य सचिव(प्रशासन), महा.जीवन प्राधिकरण, मुंबई.
13. श्री.राजेंद्र सगणे, सदस्य सचिव (तांत्रिक), महा.जीवन प्राधिकरण, मुंबई.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते :–

1. श्री.नि.कृ.माडा, मुख्य प्रशासकीय अधिकारी, महा.जीवन प्राधिकरण, मुंबई.
2. श्री.भा.आ.डोंगरे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, महा.जीवन प्राधिकरण, मुंबई.
3. श्री.शे.दौ.अरमाळ, मुख्य अभियंता, महा.जीवन प्राधिकरण, कोकण प्रदेश, ठाणे.
4. श्री.दी.के.भसाळे, मुख्य अभियंता, महा.जीवन प्राधिकरण, नागपूर.
5. श्री.मा.वि.दोमकोंडवार, मुख्य अभियंता, महा.जीवन प्राधिकरण, औरंगाबाद.
6. श्री.अ.ना.अळवणी, मुख्य अभियंता (बाहय अर्थसहाय्य), महा.जीवन प्राधिकरण, मुंबई.

या सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सदस्यांची रजा मंजूर करण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र.1 : महा.जीवन प्राधिकरणाच्या 77 व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी अशी माहिती दिली की, प्रसृत केलेल्या इतिवृत्तावर कोणत्याही सदस्याकडून कोणतीही सूचना आलेली नाही.

कार्यवाही

मु.प्र.अधिकारी व कार्यक्रमबाब तयार करणारे अधिकारी

अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी या इतिवृत्तातील काही लहान चुका/मुद्रणदोष ध्यानांत आणून दिले. त्यांनी अशाही सूचना दिल्या की, कार्यक्रम बाबी व त्या संदर्भात पत्रव्यवहार करतांना संबंधित वरिष्ठ अधिका–यांनी या बाबींकडे अधिक लक्ष पुरवावे.

अशाप्रकारे इतिवृत्तास मान्यता देण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र.2 : प्राधिकरणाच्या 77 व्या सभेतील बाबींवर करण्यांत आलेली कृती.**

कार्यक्रम बाब क्र.4 (77 वी सभा) : सन 95–96 च्या वार्षिक प्रशासकीय अहवालास मान्यता देणे .
कार्यक्रम बाब क्र.5 (77 वी सभा) : सन 96–97 च्या वार्षिक लेख्यास मान्यता देणे.

कार्यवाही

वि.स.व मु.ले. अधिकारी व मु.प्र.अधिकारी

अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी सन 96–97 च्या लेख्याबाबत पुढील कार्यवाही व वार्षिक प्रशासकीय अहवालाबाबत विचारणा केली. सदस्य सचिव (प्रशासन) यांनी असे ध्यानांत आणून दिले की, लेखापरिक्षणानंतर पुढील कार्यवाही करण्यांत येईल व प्रशासकीय अहवाल व वार्षिक लेखे दोन्ही एकत्र प्राधिकरणापुढे मान्यतेसाठी ठेवण्यांत येतील.

कार्यवाही

वि.स.व मु.ले.अ./ मु.प्र.अ./ अ.अ. (समन्वय)

कार्यक्रम बाब क्र.4 (77 वी सभा) : सन 95–96 च्या वार्षिक प्रशासकीय अहवालास मान्यता देणे.

श्री.सुरेश पटवर्धन यांनी असा मुद्दा मांडला की, सन 95–96 चा वार्षिक प्रशासकीय अहवाल प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर विधीमंडळापुढे सादर करण्यांत आला याची त्यांनी नोंद घेतली आहे. मात्र कार्यक्रम बाबीच्या इतिवृत्तात " योजना हस्तांतर करण्यापूर्वी, अशा योजनांची द्विपक्षीय तपासणी करणे , योजना चालविण्यासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध करणे इत्यादी सर्व बाबींचा उहापोह करण्यासाठी या विषयावर सभेमध्ये एक तास स्वतंत्र चर्चा होणे आवश्यक आहे, असे मा.अध्यक्षांनी सुचविले " असा जो उल्लेख आहे, त्याबाबत काय कार्यवाही झाली हेही सदस्यांना समजणे आवश्यक आहे.

कार्यवाही

मु.प्र.अधिकारी व मूळ कार्यक्रमबाब जे अधिकारी तयार करतील,ते सर्व.

तेव्हा, प्रत्येक कार्यक्रम बाबीवर ढोबळ मानाने करण्यांत आलेली कार्यवाही जरी दर्शविण्यांत आली असली तरी, अशा महत्वाच्या बाबींवर काय कार्यवाही झाली याचाही स्वतंत्र उल्लेख यापुढे केला जावा, जेणेकरुन असे महत्वाचे मुद्दे दृष्टीआड होणार नाहीत.

आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र.1 (77 वी सभा) : कन्हान पाणी पुरवठा केंद्र सुधार योजना.

कार्यवाही

अ.अ. (समन्वय)

*सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी असे ध्यानांत आणून दिले की, कामाची निकड लक्षात घेऊन व सदस्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या आग्रहास्तव या विषयावरील कार्यक्रम बाब सर्व सदस्यांना वितरित झालेली नसतानाही एक खास बाब म्हणून चर्चा करुन ही कार्यक्रम बाब मान्य करण्यांत आली. मात्र, तद्नंतर ही कार्यक्रम बाब सर्व सदस्यांना पाठविणे आवश्यक होते, पण त्यानुसार कार्यवाही झालेली नाही. सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी याबाबत सत्वर कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.*

कार्यवाही

मु.अ. (नागपूर)

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी अशी सूचना केली केली की, हे काम लवकरात लवकर पूर्ण केले जावे. त्यावर मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नागपूर यांनी अशी माहिती दिली की, या कामाची मुदत 2 वर्षे असून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली आहे. नदीच्या पात्रातील विहिरीचे काम आवश्यक त्या पातळीपर्यंत (सेफ स्टेज) पावसाळयापूर्वी आणले जाईल. तसेच पुलाच्या बांधकामासह नदीतील इतर सर्व कामे पुढील उन्हाळा संपेपर्यंत पूर्ण करण्याबाबत काटेकोरपणे लक्ष दिले जाईल.

सदस्य श्री.माधव कुलकर्णी यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, या कामासाठी भाववाढीपोटी रकम देण्यांत येणार आहे काय? त्यावर अशी माहिती देण्यांत आली की नियमानुसार " प्राईस व्हेरीएशन " पोटी देय असणारी रकम दिली जाते. श्री.माधव कुलकर्णी यांच्या मुद्याचा आशय असा होता की, राज्य शासन सुमारे 15 हजार कोटी रुपये किंमतीची कामे हाती घेणार असून हा सर्व कार्यक्रम विहित कालावधीत पूर्ण करावयाचा आहे, आणि जर अशारितीने भाववाढीपोटी अधिक पैसे देत राहिलो तर खर्च बराच वाढू शकेल आणि त्याबाबतची कल्पना प्राधिकरणाला असणे आवश्यक आहे. सामुग्री असो, वा, इतर बाबी असो, त्याबाबतच्या दरात जर प्रत्यक्षतः वाढ झाली तर, प्राधिकरणास योग्य वाटल्यास त्यापोटी रकम देणे मान्य करावे, व भाववाढीची तरतूद मूळातच काढून टाकावी अशी शासनास शिफारस करावी असेहि ते म्हणाले.

भाववाढीपोटी सरसकट रकम दिली जाते काय, या अध्यक्षांच्या विचारणेवर, सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी असे स्पष्ट केले की, पेट्रोलसह कामासाठी लागणा-या विविध सामुग्री वा इतर बाबी यात जेव्हा व जेवढी वाढ होईल त्यानुसार निर्देशांकानुसारच, शासनाने ठरवून दिलेल्या प्रमाणानुसार (फॉरम्युला) प्रत्यक्ष रकम दिली जाते. ही रकम पूर्वी जास्तीत जास्त 10 टक्के एवढी असावयाची, पण काही वर्षापूर्वी शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार काम संपेपर्यंत जेवढी भाववाढ होईल त्यानुसार रकम द्यावी लागते.

त्यांनी असेही ध्यानांत आणून दिले की, योजना तयार करतानाच अंदाजपत्रकांत भाववाढीपोटी तरतूद करावी असा आग्रह पूर्वीच्या महा. पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाने शासनाकडे धरला असताना शासनाने ही बाब मान्य केलेली नाही. तथापी अशी तरतूद नसल्यास पुढे कंत्राटदारांची मागणी मान्य करण्याबाबत अनिश्चितता येते आणि त्या परिस्थितीत निविदा सादर करतांना कंत्राटदार दर भरण्याबाबत जुगार खेळण्याची वा त्यांना जोखीम घ्यावी लागण्याची शक्यता असते. असे होऊ नये म्हणून जागतिक बँकेच्या सूचनेनुसार त्यांनी सहाय्य केलेल्या प्रकल्पामध्ये भाववाढीपोटी तरतूद करावी लागते.

या खुलाश्यानंतर या मुद्यावर प्राधिकरणाकडून आणखी कांही कार्यवाही करण्याची गरज नाही, असे ठरले.

कार्यक्रम बाब क्र.5 (77 वी सभा) : सन 96–97 च्या वार्षिक लेख्यास मान्यता देणे.

जत पाणी पुरवठा योजना तसेच पंढरपूर पाणी पुरवठा योजनेवर, जो, न वापरलेल्या साहित्याचा साठा पडून आहे, तो लवकरात लवकर वापरण्याबाबत गेल्या बैठकीत चर्चा झाली होती. त्याबाबतची सद्यस्थिती सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी सांगितली. त्यांनी असेही स्पष्ट केले की, आता जी सामुग्री शिल्लक आहे, ती ग्रामीण पाणी पुरवठा [illegible] आता ग्रामीण पाणी पुरवठा योजनेवरील [illegible] यांनीही तडे गेलेल्या [illegible]

...र्यवाही.

अ.अ. (मुख्यालय)

अ.अ. (समन्वय)

यास दुजोरा देत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी अशी सूचना केली की, पूर्वी पाणी पुरवठा मंडळाचा व्यवहार शासकीय नियमानुसार चालणारी एक यंत्रणा अश्या स्वरुपांत होत असे, त्यामुळे निधी उपलब्ध होईल तसा सामुग्रीचा साठा केला जात असे. तथापी आता कामाच्या गरजेच्या दृष्टीसंदर्भात शासकीय निधीची उपलब्धता कमी असल्याने आपण बाहेरुन 11 टक्के वा त्याहून जास्त दराने व्याज देऊन पैसे उभे करीत आहोत. तेव्हा हा पैसा लगोलग आणि सत्कारणी वापरला जावा, आणि त्याचा लाभ लवकरांत लवकर जनतेस मिळावा, हा सदस्यांच्या अभिप्रायाचा अर्थ असून त्याची दखल घेतली गेली पाहिजे. हे आपले प्राधिकरण म्हणजे आता व्यापारी दृष्टिकोनांतून व्यवहार करणारी एक यंत्रणा आहे, या दृष्टीकोनातून व झालेला हा बदल डोळयापुढे ठेऊनच यापुढे प्राधिकरणाच्या अधिका–यांनी प्रत्येक पाऊल उचलावयास हवे.

**<u>कार्यक्रम बाब क्र.3 : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन 97–98 वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक व 98–99 चे अंदाजपत्रक.</u>**

सदस्य सचिव (प्रशासन) यांनी सन 1997–98 च्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकाची तसेच सन 1998–99 च्या अंदाजपत्रकाची ठळक वैशिष्टये सांगितली.

भांडवली मिळकत व खर्चाच्या संदर्भात मा.उपाध्यक्षांनी अशी विचारणा केली कि, सन 97–98 मध्ये 882 कोटी रुपये खर्च अपेक्षित होता तो आता 1125 कोटी रुपये कसा झाला व तेवढा खर्च होणार काय अशीही विचारणा त्यांनी केली. सन 1997–98 च्या सुधारित तरतूदीमध्ये पृष्ठ क्र.14 वर 399 कोटी रुपयांची जी मिळकत दाखविली आहे, त्यामध्ये कर्जरोख्याद्वारे उभारलेल्या 299 कोटी रुपयांच्या रक्कमेचा समावेश आहे. तथापी ही रकम सन 97–98 मध्ये प्रत्यक्ष कामावर खर्च होणार नसून ती सन 98–99 मध्ये खर्च करण्यासाठी उपलब्ध होईल. भांडवली मिळकतीमध्ये घसारा निधी, कर्ज वसूली, राखीव निधी, निवृत्ती वेतन व अंशदान, तसेच भविष्य निर्वाह निधी वसूली व अधिक्य आदी बाबींची तरतूद आहे. तथापी हा पैसा प्रत्यक्ष कामावर खर्च होत नाही, असे स्पष्ट करण्यांत आले. भांडवली मिळकतीपेक्षा प्रत्यक्ष कामावरील भांडवली खर्च बराच कमी असतो.

मंत्रीमहोदयांच्या विचारणेच्या संदर्भात, वित्त सचिव श्रीमती चित्कला झुत्शी यांनी सांगितले की, याबाबतचा तपशील पृष्ठ क्र.13 ते 16 वरील विवरणपत्र क्र.3 वर दर्शविला आहे. त्याचप्रमाणे सचिव, नगर विकास विभाग यांनी सन 98–99 मध्ये 1625 कोटी रुपये खर्च खरोखरच होणार आहे काय तसेच एवढी तरतूद एकाएकी कशी वाढली अशी विचारणा केली. त्या संदर्भात मुख्य अभियंता (बाहय अर्थसहाय्य) यांनी खुलासा केला की, 1625 कोटी रुपये भांडवली मिळकत/खर्चामध्ये सन 98–99 मध्ये कर्जरोख्याद्वारे तसेच सुमिटोमो बँकेकडून अपेक्षित असलेले 700 कोटी रुपये निधीचा समावेश आहे. याशिवाय राज्य शासनाकडून अपेक्षित असलेल्या 50 कोटी रुपयांच्या बिनव्याजी रकमेचा समावेश आहे.

सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, जरी मंजूर तरतूदीनुसार प्राधिकरणास निधी प्राप्त होत असलातरी, त्यापैकी बरीच रकम इतर कारणासाठी वळवावी लागते आणि प्रत्यक्ष कामासाठी रकम कमी पडते. प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये या बाबीवर पुरेसा प्रकाश टाकणे आवश्यक आहे. सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी अशी माहिती दिली की, सन 97–98 मध्ये सुमारे 70 कोटी रुपये वळवले जाणे अपेक्षित आहेत. मुख्यत्वेकरुन कर्जफेडीच्या संदर्भात सुमारे 116 कोटी रुपयांची जबाबदारी असून त्यापैकी 37.31 कोटी रुपये वसूली होणे अपेक्षित आहे. 79.51 कोटी रुपये रक्कम वळवावी लागेल व अशारितीने आजवर प्राधिकरणास वळवावी लागणारी रकम रु. 400 कोटीच्या घरात पोहोचलेली आहे.

सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी अशी माहिती दिली की, नागरी योजनांसाठी 323 कोटी रुपयांची तरतूद असून आजवर फक्त 106 कोटी रुपये निधी मुक्त करण्यांत आला आहे. पण प्रत्यक्षात प्राधिकरणाने इतर निधीतून 210 कोटी रुपये खर्च केलेला आहे. तसेच ग्रामीण योजनांसाठी 50.75 कोटी रुपयांची तरतूद असून आजवर फक्त 21 कोटी रुपये निधी मुक्त करण्यांत आलेला असतानाही त्याच्या यातही दुपटीहून जास्त म्हणजे 48 कोटी रुपये खर्च केलेला आहे. याशिवाय केंद्र शासनाकडून 106 कोटी रुपये प्राप्त झालेले असून आणखी 30 कोटी रुपये मिळण्याची शक्यता असल्याचे सांगितले.

कार्यवाही.

वि.स.मु.ले.अ.
मु.अ.(बा.अ.)
अ.अ.(म.नि.स.)

तथापी मा.उपाध्यक्षांनी पुन्हा एकदा अशी सूचना केली की, विवरणपत्रात जरी ब–याच मोठया प्रमाणावर तपशील दिला असलातरी सर्वसाधारण सदस्यांना एकूण कार्यक्रमाची अधिक चांगल्यारितीने कल्पना येण्याच्या दृष्टीने राज्य शासन तसेच केंद्र शासन यांचेकडून अपेक्षित अर्थसहाय्य, आयुर्विमा महामंडळ, हुडको यासारख्या वित्तीय संस्था यांचेकडून अपेक्षित असलेला निधी तसेच नगरपालिका, सिडको, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आदी वित्तीय संस्थांकडून मिळावयाचा निधी याबाबतची एखाद्या तक्त्यात उपलब्ध करुन द्यावी.

ही माहिती पुढील बैठकीच्या वेळी उपलब्ध करुन दिली जाईल असे सांगून हा तपशील निराळया प्रकारे पृष्ठ क्र.13 ते 16 वर दिलेला आहे असे सदस्य सचिव (प्रशासन) यांनी व्यक्त केल्यावर मा. उपाध्यक्षांनी अशी सूचना केली की, हे सर्व ध्यानांत घेऊनही एकूण निधीची आवश्यकता किती होती, तरतूद किती होती, त्यानुसार किती निधी प्राप्त झाला व किती तूट भासली आणि त्याचा पुढील कामावर काय परिणाम होणार इत्यादी तपशील प्राधिकरणापुढे ठेवण्यांत येणा–या अंदाजपत्रकात असावा अशी सूचना केली. एवढेच नव्हेतर ही सर्व माहिती वैधानिक विकास मंडळनिहाय उपलब्ध होण्याच्या आवश्यकतेवरही त्यांनी भर दिला. सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी ही माहिती आलेखाच्या स्वरुपात सादर केली तर अधिक प्रभावी ठरु शकेल अशी सूचना केली.

कार्यवाही.

मु.अ.(बा.अ.)
म.अ.(म.नि.स.)

सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी असेही ध्यानांत आणून दिले की, गळती शोधण्याच्या बाबीवर सन 97–98 मध्ये 40 लाख रुपयांची तरतूद आहे व सुधारित अंदाजपत्रकात ही तरतूद वगळण्यांत आलेली आहे. गेली अनेक वर्षे हे असेच चालू असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. त्यावर खुलासा करण्यांत आला की, याबाबत नेमके काय करावयाचे हे न ठरल्याने, सन 97–98 मध्ये ही बाब अर्थसंकल्पित करुन घेता आली नाही.

त्यावर अपर मुख्य सचिव यांनी अशी सूचना केली की, निदान 98–99 च्या अर्थसंकल्पात ही बाब समाविष्ट होणे आवश्यक होते आणि त्यादृष्टीने प्रस्ताव पाठविणे आवश्यक होते. आता अशी तरतूद करता येणे शक्य नसल्यामुळे पूरक मागण्यांद्वारे तशी तरतूद करावयाची झाल्यास हा प्रस्ताव शासनास सत्वर सादर होणे आवश्यक आहे. त्यांनी असाही अभिप्राय व्यक्त केला की, प्राधिकरणाच्या मालकीच्या पाणी पुरवठा केंद्रांतून होणा–या पाणी पुरवठयात जी 15 टक्के येते, त्यातील काही वाचविता आली तरी बराच फायदा होऊ शकेल. त्यावर असे ठरले की, अधीक्षक अभियंता, म.नि.सं. व सं. आणि नाशिक प्रशिक्षण केंद्राचे अधीक्षक अभियंता यांनी मिळून हा प्रस्ताव एप्रिल 1998 अखेर शासनास सादर करावा.

कार्यवाही.

मु.अ.(बा.अ.)
अ.अ.(म.नि.स.)

मा.उपाध्यक्षांनी पुन्हा अशी सूचना केली की, आता सादर करण्यांत येणारी माहिती जिल्हावार देण्यांत यावी आणि प्राधिकरणाकडून आता नागरी व ग्रामीण असा पृथक विचार न करता एकात्मीक विचार होत असल्याने, संपूर्ण क्षेत्रासाठी माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच कोणत्या जिल्हयात जास्त टंचाई आहे, योजना जास्त आहेत, निधीची गरज जास्त आहे, हा विचार करुन उपलब्ध असलेल्या एकूण निधीपैकी त्या त्या ठिकाणी वाढीव प्रमाणात निधी उपलब्ध होईल असे पाहणे आवश्यक

आहे. ज्या जिल्हयामध्ये प्राधान्याने खर्च करणे आवश्यक आहे, तेथे तसा पैसा उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. अन्यथा पुढील वर्षी अपेक्षित असलेला 1600 कोटी रुपयांचा निधी क्षेत्रीय अधिका–यांच्या मागणीनुसार विविध जिल्हयांतील अनेक योजनांवर खर्च होत राहील आणि प्रत्यक्षात अडचणी असणा–या अनेक गावांचा प्रश्न तसाच राहील. टँकरमुक्ती कार्यक्रमातील गावांच्या योजना सर्वाधिक प्राधान्याने पूर्ण करण्याच्या उद्देशाने हा सर्व तपशील सादर करण्यांत यावा.

हे ठरवितांना जिल्हा पाणी पुरवठा समित्यांनी आपापल्या जिल्हयांच्या प्रस्तावास अंतीम स्वरुप देणे आवश्यक आहे असा उल्लेख झाल्यावर, मा.मंत्रीद्वयांनी अशी सूचना केली की, अंदाजपत्रकाच्या संदर्भात सादर व्हावयाची माहिती ही फक्त महाराष्ट्र जीवन प्राधिकरणापूरती असली तरी चालेल.

कार्यवाही.
अ.अ(म.नि.स.)

या संदर्भात पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी आणखी एका महत्वाच्या मुद्याचा निर्देश केला. त्यांनी असा मुद्दा मांडला की, राज्यातील सुमारे 1/4 शहरांमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणी पुरवठा केंद्रातून पाणी पुरवठा केला जातो. या पाणी पुरवठा केंद्राची कामगिरी कशी आहे आणि ती कशी सुधारता येईल इकडे काटेकोरपणे लक्ष दिल्यास तसा प्रयत्न इतर शहरांमध्येही करता येईल. या संदर्भात त्यांनी पाणी लेखा परिक्षण (वॉटर ऑडीट) संकल्पनेचा उल्लेख केला. त्यादृष्टीने त्या त्या पाणी पुरवठा केंद्रांची देखभाल दुरुस्ती कशी चालू आहे व अधिक प्रमाणात पाणी पुरवठा करता येणे शक्य आहे किंवा कसे? गळतीसह बेहिशोबी पाण्याचे प्रमाण किती, अनधिकृत नळ जोडण्या शोधून काढून त्यांची संख्या कमी करण्यांत आली किंवा कसे? थकबाकी किती आहे आणि त्याच्या वसूलीबाबत काय कार्यवाही करण्यांत आली आदी सर्व बाबींचा अभ्यास होणे आवश्यक आहे असे त्यांनी सुचविले.

थकबाकीची वसूली करण्याबाबत मुख्यत्वेकरुन काय अडचणी आहेत अशी अपर मुख्य सचिवांनी विचारणा केल्यावर सदस्य सचिव (प्रशासन व बाहय अर्थसहाय्य) यांनी स्पष्ट केले की, ही थकबाकीची वसूली जिल्हाधिका–यांमार्फत जमीन महसूलाची थकबाकी या स्वरुपात वसूल करण्याबाबत कार्यवाही होणे आवश्यक असून त्या संदर्भात प्राधिकरणाने काही जिल्हाधिका–यांशी संपर्क साधला असूनही अद्याप त्यांचेकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे कार्यवाही झालेली नाही. या संदर्भात पुन्हा केलेल्या विचारणेवरुन असे स्पष्ट करण्यांत आले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कलम–39 मधील तरतूदीनुसार ही वसूली जमीन महसूलाच्या थकबाकीच्या स्वरुपात वसूल करण्याचे अधिकार प्राधिकरणांस आहेत. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्या संदर्भातील कार्यवाही करणे हेही जिल्हाधिका–यांच्या कर्तव्यापैकी एक कर्तव्य आहे.

कार्यवाही.
वि.स.मु.ले.अ.

सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी अशी सूचना केली की, या महत्वाच्या विषयाबाबत सतत आढावा घेणे आवश्यक असून वसूली होत नसल्याने प्राधिकरणास उपलब्ध होणा–या निधीत कपात होते व त्याचा कामावर परिणाम होतो. तेव्हा यापुढे प्रत्येक बैठकीत या विषयाची माहिती देणारी कार्यक्रम बाब बैठकीपुढे ठेवण्यांत यावी.

कार्यवाही.
वि.स.मु.ले.अ.
मु.अ., नाशिक.

श्री.सुरेश पटवर्धन यांनी अहमदनगर पाणी पुरवठा योजना हस्तांतर झाली का याबाबत विचारणा केली. ही योजना हस्तांतर करण्याबाबत मंत्रीमहोदयांच्या स्तरावर नगरपालिकेच्या लोकप्रतिनिधीसमवेत चर्चा होऊन पुढील कार्यवाही करण्याचे ठरले होते. हयाबाबत वेळेची मर्यादाही घालून देण्यांत आली आहे, तेव्हा त्यादृष्टीने याबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे असा मुद्दा त्यांनी मांडला.

...7...

शिवाय या कार्यक्रम बाबीच्या ठरावाच्या वाक्यरचनेमध्ये " मंडळाच्या कायद्यातील कलम–34 (1) च्या तरतूदी " असे जे म्हटलेले आहे, त्याचा नेमका काय अर्थ आहे याचा ठरावात उल्लेख करण्यांत यावयास हवा होता असे स्पष्ट केले.

वरीलप्रमाणे चर्चा झाल्यानंतर कार्यक्रम बाब मंजूर करण्यांत आली व पुढीलप्रमाणे ठराव करण्यांत आला.

ठराव :

" प्राधिकरणाचा सन 1997–98 चा सुधारित व 1998–99 चा अंदाजित महसूली व भांडवली आय–व्यय खालीलप्रमाणे मान्य करण्यांत येतो.

(रुपये लाखात)

| अ.क्र. | तपशील. | सन 1997–98 चे सुधारित अंदाजपत्रक. | 1998–99 चे अंदाजपत्रक. |
|---|---|---|---|
| 1. | महसूली मिळकत. | 27945.16 | 34806.45 |
| 2. | महसूली खर्च. | 25400.41 | 32293.83 |
| 3. | भांडवली मिळकत. | 112536.62 | 160572.07 |
| 4. | भांडवली खर्च. | 112536.62 | 160572.07 |
| | अधिक्य. | 2544.75 | 2512.62 |

या ठिकाणी असे सूचित करण्यांत येते की, नवीन आर्थिक वर्ष सुरु होण्यापूर्वी त्यावर्षी हाती घ्यावयाच्या कामांचा तपशिल आणि खर्चाचे अंदाज प्राधिकरणाला तयार करावयाचे असतात व प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यापूर्वी त्यास शासनाची अनुमती प्राप्त करुन घ्यावयाची असते. या संदर्भात महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण कायदा 1976 च्या कलम–34, उपकलम–1 नुसार अशा ज्या तरतूदी आहेत त्यांचे पालन करण्याच्या दृष्टीने या कार्यक्रम बाबीला मंजूरी देण्यांत येत आहे. "

**कार्यक्रम बाब क्र.4 : सन 1997–98 मध्ये नागरी पाणी पुरवठा व जलनिःसारण योजनांसाठी चालू व नवीन योजनांकरिता आयुर्विमा महामंडळाकडून योजनांतर्गत कर्ज उभारणी.**

प्राधिकरणाच्या वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी पृष्ठ क्र.43 वरील माहितीत एका चूकीची दुरुस्ती सुचविली व त्यानंतर पुढीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

ठराव :

ठराव करण्यांत येतो की, आयुर्विमा महामंडळाचे पत्र क्र.आयएनव्ही/पीएस/डी, दि. 5.1.1998 (परिशिष्ट–अ) अन्वये मंजूर करण्यांत आलेले रु. 1767.06 लक्ष व पत्र क्र.आयएनव्ही/पीएस / डी, दि. 23.2.98 (परिशिष्ठ–ब) अन्वये मंजूर करण्यांत आलेले रु. 643.93 लक्ष कर्ज उभारणी सदर पत्रासोबत जोडण्यांत आलेल्या अटी व शर्तीनुसार व्हावी व मंडळाची सामान्य मुद्रा (कॉमन सील) उठवून आयुर्विमा महामंडळास करारनामा सादर करण्यासाठी प्राधिकरणाचे सदस्य सचिव / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.5 : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालकीय मंडळातील अशासकीय सदस्यांना विभागीय चौकशी प्रकरणांबाबत माहिती उपलब्ध करुन देण्याच्या मर्यादांबाबत.**

सदस्य सचिव (प्रशासन) यांनी असे स्पष्ट केले की, वरील विषयाबाबत प्राधिकरणाच्या 75 व्या बैठकीत चर्चा झाली व त्या बैठकीमध्ये जे कांही ठरविण्यांत आले, त्या बाबींची कागदोपत्री नोंद ठेवण्याच्या दृष्टीने ही कार्यक्रम बाब मांडण्यांत आली आहे. महा.जीवन प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचा-यांच्या बाबतीत जी विभागीय चौकशी केली जाते ती " न्यायालयीन खटल्याप्रमाणे " (क्वासाय् ज्युडीशीयल) अशा स्वरुपाची असल्याने न्यायप्रविष्ट प्रकरणाप्रमाणे शिस्तभंग विषयक प्राधिकरणाखेरीज कोणालाही माहिती देता येत नाही असा, या कार्यक्रम बाबीचा थोडक्यांत आशय आहे.

सदस्य श्री.राजीव सरदेशपांडे यांनी, त्यांनी या पूर्वी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात आजवर काय कार्यवाही झाली, व त्यांनी याबाबत सविस्तर माहिती देऊन एक वर्षाहून जास्त काळ लोटलेला असतांना दोषारोपपत्र ठेवणे वगैरेबाबत कारवाई केली काय अशी विचारणा केली.

कार्यवाही
मु.प्र.अधिकारी
मुख्य अभि. (सर्व)
अ.अ. (सर्व)

प्रस्तुत प्रकरणी अद्याप दोषारोपपत्र ठेवण्यांत आले नाही असे स्पष्ट झाल्यावर मा. उपाध्यक्षांनी आपली तीव्र नापसंती व्यक्त केली. या प्रकरणाशी संबंधित यंत्रणेची अशा बाबी हाताळण्याबाबतची सुस्त वा निरुत्साही दृष्टी (लेथार्जि) दिसून येते आणि याच गतीने जर अशा इतर प्रकरणी कारवाई होत राहीली, तर आपण जो एवढ्या मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम हाती घेतलेला आहे तो पूर्ण होऊन गेला तरी, संबंधितांवर कारवाई झालेली नाही, अशी वेळ येण्याची शक्यता आहे. तेव्हा सदस्यांनी केलेल्या तक्रारीवर काय कार्यवाही झाली याची त्यांना कल्पना असणे आवश्यक आहे असा अभिप्राय मा.उपाध्यक्षांनी व्यक्त केला.

त्याचबरोबर अकार्यक्षम अधिका-यांबाबतही एक सविस्तर आढावा घ्यावा असे मा. उपाध्यक्षांनी सुचविले. अनेक अधिकारी कार्यक्षम नाहीत, आपले काम योग्य रीतीने पार पाडत नाहीत अशा तक्रारी त्यांच्या वरिष्ठ अधिका-यांकडून केल्या जातात आणि त्याची तांतडीने दखल घेणे आवश्यक असल्याचे व तसे झाल्यासच कामे लवकर व चांगली होऊ शकतील असे त्यांनी सांगितले.

कार्यवाही
मु.प्र.अधिकारी

- पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी अशी सूचना केली की, लोकप्रतिनिधींकडून तसेच मंडळाच्या सदस्यांकडून ज्या अधिकारी/कर्मचा-यांच्या तक्रारी केल्या जातात, त्या प्रकरणी , प्रकरणनिहाय सद्यस्थिती दर्शविणारा एक तक्ता प्राधिकरणाच्या प्रत्येक बैठकीत उपलब्ध करुन द्यावा व त्या अनुषंगाने चर्चा व्हावी.

कार्यवाही
मु.प्र.अधिकारी
आ.अ. (दक्षता)

मा.मंत्री तथा अध्यक्ष यांनी अशी सूचना केली की, प्राधिकरणाच्या सदस्यांनी माहितीसह तक्रारी केल्यावर किती दिवसांत निर्णय घेतला जावा, याबाबत काही कालमर्यादा ठरवून देता येईल काय याचा विचार व्हावा. निदानपक्षी प्राथमिक चौकशी होऊन पुढे कोणत्या प्रकारची कार्यवाही अपेक्षित आहे, ही माहिती, तक्रार आल्या दिवसापासून तीन महिन्यामध्ये झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवण्यांत यावी अशी त्यांनी सूचना केली.

विभागीय चौकशी पूर्ण होऊन त्याबाबत निष्कर्ष काढण्यांत येऊन संबंधितांवर कारवाई झाल्यानंतर सर्व कागदपत्रे दाखविण्यांत यावेत, या मागणी बरोबरच एकूणच विभागीय चौकशी हाताळण्यासाठी जो कालावधी जातो, त्या दरम्यान संबंधितांवर काही कारवाई होत नाही व प्रसंगी त्यांना पदोन्नती मिळते व असे होता कामा नये असाही मुद्दा मांडण्यांत आला.

...9...

शासकीय नियमानुसार विभागीय चौकशीची कारवाई होत असते व ही कारवाई त्वरेने होणे आवश्यक आहे हे मान्य करुनही नियमानुसार जी कागदपत्रे देता येत नाहीत व ती द्यावयाची झाल्यास नियमानुसार कायद्यात बदल करावा लागेल असे स्पष्ट करण्यांत आले.

कार्यवाही
मु.प्र.अधिकारी

सामान्य प्रशासन विभागाच्या अलिकडच्या एका परिपत्रकाचा उल्लेख करुन अपर मुख्य सचिवांनी असे ध्यानांत आणून दिले की, विभागीय चौकशी एक वर्षात पूर्ण केली पाहिजे असे शासनाचे आदेश आहेत.

विभागीय चौकशीचे काम सत्वर हाताळण्यावर भर देत मा.मंत्रीमहोदयांनी अशी सूचना केली की, गैरव्यवहारांना आळा बसावा हा विभागीय चौकशीचा मूळ हेतू असतो आणि चौकशीचे काम रखडत राहून संबंधितांवर वेळीच कारवाई न झाल्यास चौकशीचा मूळ उद्देश विफल होतो हे संबंधितांनी ध्यानांत ठेवले पाहिजे. सदस्य श्री.राजीव सरदेशपांडे यांनी, ज्या प्रकरणाचा उल्लेख केला त्या प्रकरणी दीड वर्ष होऊनही जर प्राथमिक चौकशी पूर्ण झालेली नसेल, तर विभागीय चौकशी एक वर्षामध्ये कशी पूर्ण होईल अशी त्यांनी शंका प्रदर्शित केली. याशिवाय, आपल्याकडे अनेक तक्रारी येतात, त्यावर त्वरित कार्यवाही करुन आपणास अवगत करावे अशी सूचना देऊनही आपणाला कळविले जात नाही अशी तक्रार मा.मंत्रीमहोदयांनी केली.

चर्चेच्या ओघाने प्राधिकरणामध्ये दक्षता पथकाची स्थापना केलेली आहे काय, त्याची रचना कशी आहे व त्याचे नियंत्रण कोणाकडे आहे, अशी विचारणा मा.उपाध्यक्षांनी केली. सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी अशी माहिती दिली की, पाणी पुरवठा मंडळामध्ये अधीक्षक अभियंत्यांच्या नियंत्रणाखाली गुणवत्ता नियंत्रण कक्ष निर्माण करण्यांत आला असून याच कक्षाकडे दक्षतेशी संबंधित बाबी अनुषंगिक काम म्हणून सोपविलेल्या आहेत. तथापि कामाबद्दल /अधिका–याबद्दल तक्रार येताच आठ दिवसांत त्या ठिकाणी भेट देऊन, माहिती घेऊन, चौकशी करु शकणारे एक स्वतंत्र दक्षता पथक कार्यान्वित होणे गरजेचे आहे, यावर मा.उपाध्यक्षांनी भर दिला. तसेच हे पथक प्राधिकरणाचे सदस्य सचिव (तांत्रिक) वा सदस्य सचिव (प्रशासन) यांच्या नियंत्रणाखाली असू नये तर ते, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या मंत्रीमहोदयांच्या थेट नियंत्रणाखाली असावे, अशीही त्यांनी सूचना केली.

कार्यवाही
मु.प्र.अ.
मुख्य अभियंता

त्यावर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी अशी सूचना केली की, हे दक्षता पथक मंत्रीमहोदयांच्या थेट नियंत्रणाखाली न ठेवता प्राधिकरणाचे पदसिध्द सदस्य असणा–या शासनाच्या तीन सचिवांच्या समितीच्या थेट नियंत्रणाखाली असणे उचित राहील. या पथकाचे स्वरुप काय असावे, रचना कशी असावी, कार्यपध्दती कशी असावी, आणि त्या पथकात काम करणारे अधिकारी हे प्राधिकरणातील असावेत की प्राधिकरणाबाहेरील असावेत आदी बाबी ठरविण्यांत याव्यात, अशीही सूचना त्यांनी केली.

सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी अशी सूचना केली की, दक्षता पथक निर्माण करण्याचा तत्वतः निर्णय या बैठकीत झाला आहे असे समजावे आणि पुढील बैठकीत या पथकाच्या निर्मितीबाबत एक कार्यक्रम बाब ठेवावी.

त्यासंदर्भात अपर मुख्य सचिव यांनी ध्यानांत आणून दिले की, या पथकातील वरिष्ठ अधिका–यांचा समावेश असणा–या पदांच्या निर्मितीसंदर्भात ही बाब मंत्रीमंडळापुढेही ठेवावी लागेल.

**<u>कार्यक्रम बाब क्र.6 : सावदा वाढीव पाणी पुरवठा योजना – आवक विहिर, जोड पाईपलाईन, पंपगृह, उध्दरण विहिर व 273 मि.मि. व्यासाची पोलादी पाईपांची उध्दरण नलिका, बिडाची अशुध्द व शुध्द पाण्याची उर्ध्ववाहिनी, वितरण व्यवस्था इ. कामाच्या निविदा स्वीकृतीबाबत.</u>**

या योजनेच्या पाचव्यांदा बोलाविलेल्या निविदा स्वीकारण्याची बाब दि. 15.10.1997 रोजी प्राधिकरणाच्या बैठकीत विचारात घेण्यांत आली होती व ती अस्वीकृत करुन पुन्हा (सहाव्यांदा) निविदा बोलाविण्याचा निर्णय घेण्यांत आला होता. तद्नंतर पुन्हा निविदा मागवून त्यानुसार कार्यक्रम बाब तयार करण्यांत आली आहे व दरम्यान प्राधिकरणाची बैठक केव्हा होणार हे निश्चित नसल्याने व ही कार्यक्रम बाब, आचारसंहितेमुळे, फीरवून (बाय सर्क्युलेशन) मान्य करणेही शक्य नसल्याने मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांचे अनुमतीने स्वीकारण्यांत आली.

तेव्हा आता ही निविदा स्वीकारतांना पूर्वीपेक्षा किती अधिक खर्च करणे मान्य करण्यांत येत आहे अशी विचारणा श्री.सुरेश पटवर्धन यांनी केली. त्यावर सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी खुलासा केला की, कार्यक्रम बाबीचे पृष्ठ क्र.23 वर, परिच्छेद–3 मध्ये म्हटल्याप्रमाणे पाचव्या बोलीच्या वेळी आलेल्या देकारापेक्षा आता मान्य करण्यांत आलेली निविदा रु. 10,28,000/– पेक्षा जास्त खर्चाची आहे.

हे काम सुरु करण्यास खूप कालावधी गेला असल्याने व काम लवकर सुरु करणे आवश्यक असल्याने तसेच जास्तीतजास्त काम होण्याचा कालावधी (वर्किंग सिझन – मार्च ते जून) उपयोगात आणला जावा या दृष्टीने मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाच्या अध्यक्षांच्या अनुमतीने ही निविदा स्वीकारण्यांत आली आहे अशी माहिती देण्यांत आली.

या चर्चेनंतर पुढीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

<u>ठराव :</u>

जळगांव जिल्हयातील सावदा वाढीव पाणी पुरवठा योजनेतील उद्भव, उध्दरण वलिका व वितरण व्यवस्थेच्या कामासाठी मे. तापी प्रिस्ट्रेस्ड प्रॉडक्टस् लि, अंजाळे (जिल्हा–जळगांव) यांची 30 टक्के अधिक्याची म्हणजेच रु. 1,06,96,803/– किंमतीची निविदा मंजूर करण्यांत येत आहे.

सदर निविदा स्वीकृत करुन प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यासंबंधीची आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार प्राधिकरणाच्या सदस्य सचिव (तांत्रिक) यांना देण्यांत येत आहेत.

**<u>कार्यक्रम बाब क्र.7 : ग्रामीण पाणी पुरवठा योजनांतर्गत यांत्रिकी व विद्युतसंबंधी कामांच्या निविदा स्वतंत्रपणे मागविण्याबाबत.</u>**

सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी असे विषद केले की, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांतर्गत कामापैकी स्थापत्य कामांच्या निविदा स्वतंत्र काढणे आणि यांत्रिकी व विद्युत कामांच्या निविदा स्वतंत्रपणे मागविण्याबाबत यापूर्वी विचार झालेला होता आणि यांत्रिकी व विद्युत कामांच्या निविदा स्वतंत्रपणे मागविण्याचा प्रस्ताव या कार्यक्रम बाबीद्वारे मांडला आहे.

सचिव, नगर विकास विभाग यांनी स्थापत्य व यांत्रिकी ही कामे एकत्रित असावीत म्हणजे समन्वयाच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल असे सांगितले. सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी असे ध्यानांत आणून दिले की, मंत्रीमंडळ उपसमितीने घेतलेल्या निर्णयानुसार स्थापत्य, यांत्रिकी व विद्युत संबंधी सर्व कामासाठी एकत्रित निविदा मागविण्याचे ठरविण्यांत आले आहे.

कार्यवाही

अ.अ. (समन्वय)
अ.अ. (यांत्रिकी)

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या मंत्रीमहोदयांनी असे मत व्यक्त केले की, या विषयावर यापूर्वी चर्चा झालेली आहे व निर्णय घेण्यांत आलेला आहे हे खरे आहे. तसेच आता आपण सुमारे 17000 योजनांची कामे हाती घेणार असल्याने जर या कामांसाठी स्वतंत्र निविदा काढावयाच्या झाल्यातर कामाचे प्रमाण अधिकच वाढेल. आधिच प्राधिकरणाकडे क्षेत्रिय स्तरावर पूरेसे मनुष्यबळ नाही म्हणून, बाहेरुन मनुष्यबळ उपलब्ध करुन घेता येईल काय, असा विचार करीत असतांना अशाप्रकारे स्थापत्य, यांत्रिकी व विद्युत संबंधी स्वतंत्र निविदा मागवून काम वाढवावयाचे का, हाही विचार करावा असा अभिप्राय व्यक्त केला. मा.मंत्रीमहोदयांनी पुढे असेही सुचविले की, या संदर्भात अनुभव घेण्याच्या दृष्टीने काही प्रमाणात विचार करावयास हरकत नाही. अर्थात त्यासाठी काही निकष ठरवावे लागतील असेही मंत्रीमहोदयांचे म्हणणे होते. इतरही काही सदस्यांनी आपले अभिप्राय व्यक्त केल्यावर अशी सूचना करण्यांत आली की, योजनांची किंमत 2 कोटी रुपयापेक्षा कमी असेल, अशा काही योजनांपुरता हा प्रयोग करुन बघावा. तथापि वेळेची मर्यादा ध्यानात घेता या बैठकीत कार्यक्रम बाबीवर पूर्ण विचार होणे शक्य नव्हते आणि म्हणून आजच्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये एक कार्यक्रम बाब निर्णयार्थ मांडण्यांत यावी, असे ठरविण्यांत आले.

मा.मंत्रीमहोदयांनी मांडलेल्या विचारांच्या अनुषंगाने सदस्य श्री.सुरेश पटवर्धन यांनी पुढीलप्रमाणे सूचना मांडल्या.

(अ) योजनांची व कामांची संख्या प्रचंड असल्याने आणि त्या संदर्भात क्षेत्रिय अधिका–यांवरील सतत वाढता बोजा लक्षात घेता काही योजनांची कामे एकत्रित करुन मोठया स्वरुपाच्या निविदा काढाव्यात.

कार्यवाही

मु.अ., पुणे
अ.अ. (समन्वय)

(आ) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या संदर्भात योजनांच्या विविध उपांगामध्ये अनेक बाबी (आयटेम) येतात. त्या सर्वासाठी स्वतंत्रपणे मोजमाप नोंदणी करणे जिकीरीचे व वेळ खाऊ असते. वाढत्या कामाच्या संदर्भात याचा पुर्नविचार होणे आवश्यक आहे. याच संदर्भात त्यांनी पंपहाऊसच्या कामाचे उदाहरण देऊन क्षेत्रिय अभियंत्यांवरचा मोजमाप नोंदी घेणे व बिले करणे याबाबतचा बोजा कसा कमी करता येईल या दृष्टीने त्या उपांगामध्ये नेमके काय काय अपेक्षित आहे याचे स्वतंत्र विनिर्देश स्पष्ट करुन, (स्पेसिफिकेशन) ठोक स्वरुपात (लंपसम) निविदेमध्ये तरतूद करण्याचा विचार करावा. थोडक्यात, हे संपूर्ण उपांग हीच एक बाब होईल. काही वर्षापूर्वी जलकुंभासाठी प्रत्येक बाबीची स्वतंत्र तरतूद असणा–या निविदा काढल्या जात असत व आता आवश्यक गोष्टीपुरत्या व विनिर्देशाप्रमाणे संपूर्ण जलकुंभासाठी ठोक स्वरुपात निविदा मागविण्यांत येतात याचीही नोंद घेण्यांत आली.

या संदर्भात आपण पुण्याच्या मुख्य अभियंत्यांशी सविस्तर चर्चा करुन त्यांना काही सूचना दिलेल्या आहेत असेही श्री.पटवर्धन यांनी स्पष्ट केले. त्यांवर, या विषयावर पुढील बैठकीत स्वतंत्रपणे चर्चा करण्यांत यावी, असे ठरले.

वेळेच्या मर्यादेमुळे आजच्या बैठकीतील चर्चा आवरती घेणे भाग पडल्यामुळे ही बाब व चर्चा होऊ न शकलेल्या इतर सर्व बाबी प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी घेण्याचे ठरले.

वरीलप्रमाणे चर्चेनंतर मा.मंत्रीद्वय महोदयांचे आभार मानून प्राधिकरणाची 78 वी बैठक संपन्न झाली असे जाहिर करण्यांत आले.